महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २४ जून २००६

# अधिसूचना

**क्रमांक- एमईडी २००६/११९६/प्र.क्र.२०४/०६/शिक्षण-१(१)** - महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) अध्यादेश, २००६ (सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक पाच) याच्या कलम २ (ज) द्वारे प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ या सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले आरोग्य विज्ञानातील शैक्षणिक अभ्यासक्रम "व्यावसायिक अभ्यासक्रम" म्हणून अधिसूचित करीत आहे.

## अनुसूची

| | | |
|---|---|---|
| १ | वैद्यक आणि शल्यचिकित्सा स्नातक | (एमबीबीएस) |
| २ | दंतशल्य स्नातक | (बीडीएस) |
| ३ | आयुर्वेदाचार्य | (बीएएमएस) |
| ४ | समचिकित्सा वैद्यक व शल्यचिकित्सा स्नातक | (बीएचएमएस) |
| ५ | कामिल-ए-तिब्ब-ओ-जराहत | (बीयुएमएस) |
| ६ | भौतिकोपचार स्नातक | (बीपीटीएच) |
| ७ | व्यवसायोपचार स्नातक | (बीओटीएच) |
| ८ | विज्ञान स्नातक (परिचर्या) | (बी.एस्सी.नर्सिंग) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ए. एम. खान)
शासनाचे प्रधान सचिव

m-26
1:45 PM

## NOTIFICATION

Medical Education and Drugs
Department,
Mantralaya, Mumbai 400 032.

Dated the 24rd June 2006.

Maharashra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes and Other Backward Classes) Ordinance, 2006

No.MED 2006/1196/CR-204/06/Edu-1 (1) .- In exercise of the powers conferred by clause (j) of section 2 of the Maharashra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes) Ordinance, 2006 (Mah. Ord. V of 2006), the Government of Maharashtra hereby notifies the educational courses of study in Health Sciences, mentioned in the Schedule appended hereto, to be Professional Courses for the purposes of the said Ordinance.

SCHEDULE

1. Bachelor of Medicine and Bachelor of Surgery (MBBS)
2. Bachelor of Dental Surgery (BDS)
3. Bachelor of Ayurved Medicine and Surgery (BAMS)
4. Bachelor of Homeopathic Medicine and Surgery (BHMS)
5. Bachelor of Unani Medicine and Surgery (BUMS)
6. Bachelor of Physiotherapy (BPTh)
7. Bahelor of Occupational Therapy (BOTh)
8. Bachelor of Sciences (Nursing) (BSc (Nursing))

By order and in the name of the Governor of Maharashra,

(A.M.Khan)
Principal Secretary to Government.

30n-15
4/06 2.00 PM

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २४ जून २००६

## आदेश

महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) अध्यादेश, २००६ ।

**क्रमांक- एमईडी २००६/११९६/प्र.क्र.२०४/०६/शिक्षण-१** - महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) अध्यादेश, २००६ (सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक पाच) याच्या कलम ४, पोटकलम (२) च्या परंतुकाद्वारे प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयातील उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागा, त्या त्या जातींचे, जमातींचे व वर्गांचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास, ज्या पध्दतीने भरण्यात येतील ती पध्दती विर्निदिष्ठ करणारा पुढील आदेश देत आहे, तो असा:-

१) या आदेशास, आरोग्य विज्ञानशास्त्रातील व्यावसायिक अभ्यासक्रम (उक्त जाती, जमाती किंवा वर्ग यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागा भरण्याकरिता योग्य उमेदवार उपलब्ध नसल्यास राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या जागा भरण्याची पध्दती) आदेश, २००६ असे म्हणावे.

२) आरक्षित प्रवर्गाची आणखी पुढील ३ गटांमध्ये पुर्नविभागणी करण्यात येईल, ती अशी :-

(एक) गट-ए मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतून बौध्द धर्मात धर्मांतरित झालेल्या उमेदवारांच्या व अनुसूचित जमातीतील उमेदवारांचा समावेश असेल,

(दोन) गट-बी मध्ये निरधिसूचित जमाती (ए) व भटक्या जमाती (बी) यांमधील उमेदवारांचा समावेश असेल,

(तीन) गट-सी मध्ये भटक्या जमाती (सी), भटक्या जमाती (डी) व इतर मागासवर्गाच्या उमेदवारांचा समावेश असेल.

३. कोणत्याही गटातील राखीव प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, त्याच गटामधील अन्य राखीव प्रवर्गातील उमेदवारांमधील आपसातील गुणवत्तेच्या आधारे एखाद्या उमेदवारास प्रवेश देऊन ती जागा भरण्यात येईल.

४. त्याच गटातील एखाद्या उमेदवारास प्रवेश देऊन एखादी जागा भरता येणे शक्य नसल्यास, ती जागा रिक्त जागांच्या संकोषात स्थानांतरित करण्यात येईल आणि अन्य कोणत्याही राखीव प्रवर्गातील उमेदवारांमधून, या प्रयोजनार्थ तयार करण्यात आलेल्या यादीतून आपसातील गुणवत्तेच्या आधारे, अन्य कोणत्याही गटामधील राखीव प्रवर्गात असलेल्या उमेदवारांना प्रवेश देऊन ती जागा भरण्यात येईल.

५. कोणत्याही गटातील उमेदवाराला प्रवेश देऊन एखादी जागा भरता येणे शक्य नसल्यास ती जागा, राखीव प्रवर्गात असलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांना आपसातील गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देऊन भरण्यात येईल.

**स्पष्टीकरणः-** या आदेशाच्या प्रयोजनार्थ, आपसातील गुणवत्ता ही, २००६-२००७ या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात आलेल्या संबंधित सामायिक प्रवेश परीक्षेत उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निश्चित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ए. एम. खान)
शासनाचे प्रधान सचिव

ranjana-notification-28
Last printed 06/24/06 1:20 PM

**ORDER**

Medical Education and Drugs
Department,
Mantralaya, Mumbai 400 032.

Dated the 24rd June 2006.

Maharashra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes and Other Backward Classes) Ordinance, 2006.

No. No.MED 2006/1196/CR-204/06/Edu-1 .- In exercise of the powers conferred by the proviso to sub-section (2) of section 4 of the Maharashra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes) Ordinance, 2006 (Mah. Ord. V of 2006), the Government of Maharashtra hereby makes an Order specifying the manner in which the seats reserved for candidates belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, and Other Backward Classes shall be filled in, in the event the candidates from the respective Castes, Tribes or Classes are not available, as follows:-

1. This Order may be called the Professional Courses in Health Sciences (Manner of filling seats of Reserved Category Candidates if suitable candidates are not available to fill in the seats reserved for the said Castes, Tribes or Classes ) Order, 2006.

2. The Reserved Category shall be further sub-divided into following three Groups, namely:-

(i) Group A shall consist of candidates belonging to the Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism, and Scheduled Tribes ;

(ii) Group B shall consist of the candidates belonging to the De-notified Tribes (A) and Nomadic Tribes (B);

(iii) Group C shall consist of the candidates belonging to the Nomadic Tribes (C), Nomadic Tribes (D) and Other Backward Classes.

3.If the candidate belonging to the Reserved Category from any Group is not available, the seat shall be filled in by admitting a candidate, on the basis of *inter-se* merit , from amongst the candidates, belonging to the Reserved Category from the same Group.

4.If a seat can not be filled in by admitting candidate belonging to the same Group, the seat shall be transferred to a pool of vacant seats and shall be filled in by admitting the candidates belonging to Reserved Category, from any other Group on the basis of *inter-se* merit, from the list prepared for the purpose, from amongst the candidates belonging to any other Reserved Category.

5. If a seat can not be filled in by admitting candidate belonging to any of the Groups, the same may be filled in by admitting candidates, on the basis of *inter-se* merit, from the students other than those belonging to the Reserved Category.

Explanation.- For the purposes of this Order, inter-se merit shall be determined on the basis of the marks secured by a candidate at the applicable Common Entrance Test (CET) conducted for the Academic Year 2006-2007.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(A.M.Khan)

Principal Secretary to Government.

ranjana-notfiction-17
Last printed 06/24/06 1:55 PM

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २४ जून २००६

## अधिसूचना

**क्रमांक- एमईडी २००६/११९६/प्र.क्र.२०४/०६/शिक्षण-१ (२)** - महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) अध्यादेश, २००६ (सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक पाच) याच्या कलम ५ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन, याद्वारे, प्रत्येक अनुदानेतर खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेमध्ये, राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी आरक्षित ठेवावयाच्या जागा या, शासकीय अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक - एमईडी २००६/११९६/प्र.क्र.२०४/०६/शिक्षण-१ (१), दिनांक २४ जून, २००६ अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या, आरोग्य विज्ञानामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीच्या मंजूर प्रवेश संख्येच्या २५ टक्के इतक्या असतील, असे निदेश देत आहे.

**स्पष्टीकरण:-** राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी आरक्षित असलेल्या जागांची संख्या निश्चित करताना ती अपूर्णांकात निर्माण झाली आणि ती संख्या अर्ध्यापेक्षा कमी असल्यास ती विचारात घेण्यात येणार नाही आणि ती अर्धी किंवा त्या पेक्षा अधिक असेल तर तिचे रुपांतर पूर्ण एका जागेमध्ये करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ए. एम. खान)
शासनाचे प्रधान सचिव

**NOTIFICATION**

Medical Education and Drugs
Department,
Mantralaya, Mumbai 400 032.

Dated the 24rd June 2006.

Maharashra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes and Other Backward Classes) Ordinance, 2006.

No. No.MED 2006/1196/CR-204/06/Edu-1 (2)- In exercise of the powers conferred by sub-section (1) of section 5 of the Maharashra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes) Ordinance, 2006 (Mah. Ord. V of 2006), the Government of Maharashtra hereby directs that, the seats to be reserved for candidates belonging to the Reserved Category, in every Unaided Private Professional Educational Institution, shall be 25 per cent. of the Sanctioned Intake of the Professional Courses in Health Sciences, specified under Government Notification, Medical Education and Drugs Department, No.- No.MED 2006/1196/CR-204/06/Edu-1 (1) dated the 24rd June, 2006.

Explanation.- In determining the number of seats reserved for the Reserved Category a fraction of a seat, if less than one- half shall be ignored and if one- half or more shall be reckoned as one.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(A.M.Khan)

Principal Secretary to Government.

ranjana-notfiction-18
Last printed 06/24/06 2:01 PM